# प्रेसनोट

दि.०१/०२/२०२२

## सार्वजनिक बांधकाम विभाग, उप विभाग, मंगळवार पेठ, पुणे येथील वरिष्ठ लिपिकावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १७/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - अनिल कोंडाजी आढारी, वय - ४० वर्षे,<br>पद - वरिष्ठ लिपिक, सार्वजनिक बांधकाम विभाग, उप विभाग क्र.०४, मंगळवार पेठ, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५,०००/- (पंधरा हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २५/०९/२०२१
गुन्हा दाखल दिनांक :- ३१/०१/२०२२

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे कंपनीकरीता सरकारी कामे करण्यासाठी आवश्यक असलेला परवाना मिळावा याकरीता लोकसेवक यानी १५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे कंपनीकरीता सरकारी कामे करण्यासाठी आवश्यक असलेला परवाना मिळणेसाठी दाखल केलेली फाईल मंजुर करून देणेसाठी आरोपी लेकसेवक आढारी यानी १० हजार ते १५ हजार रूपये लाचेची मागणी स्वतःसाठी व त्याचे वरिष्ठांसाठी केली म्हणून वरिलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस निरीक्षक अलका सरग तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००५.
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.